वर्ष : १३८

Regd. No. PCW/002/2018-2020-S.P.College Post-RNI No. 1755/57

केसरी

राष्ट्रीय ठेवा

● अंक ६४ ● पृष्ठे : १२ ● चार रुपये ● बुधवार, ७ मार्च २०१८, पुणे C (शहर आवृत्ती)

# ससूनच्या आधुनिकीकरणासाठी 'सीएसआर' महत्त्वपूर्ण

**पुणे** : ससूनसारख्या सरकारी रुग्णालयातून गरीब रुग्णांना आधुनिक उपचार उपलब्ध करून देण्यासाठी शासनाच्या निधीबरोबरच सामाजिक आणि उद्योग संस्थांच्या सीएसआरचा महत्त्वाचा वाटा आहे. मुकुल माधव फाउंडेशनसारख्या संस्थांनी पुढाकार घेऊन ससूनमधील आरोग्य सुविधा अधिक सक्षम कराव्यात, असे प्रतिपादन विभागीय आयुक्त चंद्रकांत दळवी यांनी केले.

फिनोलेक्स इंडस्ट्रीजच्या सीएसआर भागीदार असलेल्या मुकुल माधव फाउंडेशनच्या वतीने एक कोटी खर्चून उभारण्यात आलेल्या पचनसंस्थाविकार निदान व उपचार केंद्राचे आणि रुग्णाच्या नातेवाईकांसाठी सर्व सुविधांनी युक्त प्रतीक्षा कक्षाचे उद्घाटन व लोकार्पण चंद्रकांत दळवी यांच्या हस्ते झाले. 'मोहिनी व प्रल्हाद छाब्रिया' यांच्या स्मरणार्थ हे केंद्र आणि प्रतीक्षा कक्षा उभारण्यात आले आहेत.

याप्रसंगी हिंदुजा रुग्णालयाचे डॉ. फिलिप अब्राहिम, लंडन येथील रॉयल कॉलेजचे डॉ. अरविंद शहा, ससून रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. अजय चंदनवाले, मुकुल माधव फाउंडेशनच्या संस्थापक संचालिका रितू प्रकाश छाब्रिया, प्रकाश छाब्रिया, ससून सर्वोपचार रुग्णालयाच्या डॉ. शशीकला सांगळे, डॉ. शीतल महाजन, डॉ. हरीश टाटिया, विनोद रोहानी उपस्थित होते.

चंद्रकांत दळवी म्हणाले, शासकीय रुग्णालयांतून गरजू रुग्णांना अधिक लाभ होण्यासाठी या रुग्णालयांचे आधुनिकीकरण गरजेचे आहे. मदतीसाठी शहर परिसरातील कंपन्या आणि संस्थांनी यासाठी पुढाकार घ्यावा. रितू प्रकाश छाब्रिया म्हणाल्या, आर्थिक परिस्थिती बेताची असणाऱ्या रुग्णांनाही एन्डोस्कोपी उपचार मिळावेत, या हेतूने फाउंडेशनने या केंद्राचे आधुनिकीकरण केले आहे.



ससूनमध्ये येणाऱ्या रुग्णांच्या नातेवाईकांच्या सोयीसाठी नऊ ठिकाणी प्रतीक्षा कक्ष उभारण्यात येत आहेत. त्यातील बाल रुग्ण विभागाजवळील पहिल्या प्रतीक्षा कक्षाचे उद्घाटन झाले.

UCHIT Media : 9767789529